**स.फौ.के. नं. २५२/२०२३**

**नि. क्र. १२ लगत**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – अमोल शशिकांत मांगले,

**वय** – ३४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस शिपाई ब. क्र. ३८०)

**सध्या नेमणूक** – मोटार परीवहन विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कुमारी एस. आर. वनकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक १६/०६/२०२३ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख येथे पोलीस शिपाई या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी अपराध क्र. ९४/२०२३ चा नमुना मुद्देमाल कोल्हापूर येथील न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेत जमा करण्याचे कर्तव्य मला नेमण्यात आले होते. मी तो मुद्देमाल व त्यासाठीचा अहवाल ताब्यात घेवून देवरुख येथून कोल्हापूर येथील त्या प्रयोगशाळेत गेलो. तेथे मी तो नमुना मुद्देमाल व अहवाल जमा करुन अहवालाच्या प्रतीवर तेथील लिपीकाची स्वाक्षरी व शिक्का घेतले. ती प्रत तपास अधिकारी यांच्याकडे दिली. मला आता दाखविण्यात आलेली प्रत तीच आहे (सदर दस्तास **निशाणी १७** देण्यात आली).

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. सी. व्ही. लिंबूकर यांचेकडून –**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, मी नमुना मुद्देमाल व अहवाल ताब्यात घेतल्याबाबत माझ्या सहीचा कोणताही कागद तयार करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी देवरुख ते कोल्हापूर व कोल्हापूर ते देवरुख असा प्रवास केल्याचे दर्शविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा तपास अधिकारी यांच्याकडे दिलेला नाही.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, मी नमूद दिवशी नमूना मुद्देमाल व अहवाल घेवुन गेल्याचे खोटेच सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नमूना मुद्देमाल व अहवाल

प्रयोगशाळेत जमा केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १७ कडील दस्त खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA Date: 2024.11.28 14:59:15 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक –२८.११.२०२४ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 28/11/2024 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 28/11/2024 |
| Evidence uploaded on | : | 28/11/2024 |